# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

(सामान्य प्रशासन शाखा)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनीः कार्यालयः ०७१२–२५२२९९१ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


## अधिसूचना

क्रमांकः रातुमनावि/साप्र/२०१७/१५ दिनांकः १७ नोव्हेंबर २०१७

## अधिसभेसाठी नोंदणीकृत पदवीधरांची निवडणूक

या अधिसूचनेनुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सर्व नोंदणीकृत पदवीधरांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम २८(२)(न), (u/s 28(2)(t)), कलम १३१(५), महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेला सन २०१७ चा एकरूप परिनियम क्रमांक १, विद्यापीठ निदेश क्रमांक १९/२०१७ व २०–जी/२०१७ नुसार विद्यापीठाच्या **अधिसभेवर दहा नोंदणीकृत पदवीधर** निवडून देण्याकरिता मा. कुलगुरूंचे मान्यतेने विद्यापीठ निदेश क्रमांक २०ए/२०१७ प्रमाणे निवडणूक वेळापत्रक घोषित करण्यात येत आहे.

### निवडणूक वेळापत्रक भाग – १ (मतदार यादी)

| अ.क्र | विवरण | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २८(२) (न) नुसार नामनिर्देशनाचे दिनांकाच्या किमान ५ वर्ष अगोदर पदवी प्राप्त केलेले **दहा नोंदणीकृत पदवीधर अधिसभेवर** निवडून देण्याकरिता विद्यापीठ निदेश क्रमांक २०–जी/ २०१७ नुसार नोंदणीकृत पदवीधरांच्या निर्वाचक गणात आपले नाव समाविष्ट करण्याकरिता नोंदणीकृत पदवीधरांनी नाव व इतर माहिती विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.org** संकेत स्थळावरील **Election - 2017** या **Portal** वर उपलब्ध असलेल्या **"Form-B"** मध्ये **Online** प्रणालीने सादर करण्याचा **अंतिम दिनांक.** | **शनिवार,<br>दिनांक २ डिसेंबर २०१७** |
| २. | नोंदणीकृत पदवीधरांनी **Online** प्रणालीने **FORM-B** मध्ये नाव व इतर माहिती **Election - 2017** या **Portal** वर सादर केल्यानंतर त्याची मुद्रीत प्रत काढून त्यावर स्वाक्षरी करून त्यासोबत पदवीची सांक्षांकित प्रत संलग्न करून, **FORM-B** ची मुद्रीत प्रत विद्यापीठ निवडणूक कक्षात सादर करण्याचा **अंतिम दिनांक.** | **गुरूवार,<br>दिनांक ७ डिसेंबर २०१७<br>सायंकाळी ५.०० पर्यंत** |
| ३. | नोंदणीकृत पदवीधर निर्वाचक गणाची **तात्पुरती मतदार यादी** प्रसिध्द करण्याचा **दिनांक.** | **सोमवार,<br>दिनांक १८ डिसेंबर २०१७** |
| ४. | नोंदणीकृत पदवीधर निर्वाचक गणाच्या तात्पुरत्या मतदार यादीवर कुलसचिवांकडे आक्षेप नोंदविण्याचा **अंतिम दिनांक.** | **शुक्रवार,<br>दिनांक २२ डिसेंबर २०१७<br>सायंकाळी ५.०० पर्यंत** |

(कृ.मा.पहावे)